## रे. दिवाणी मुकदमा नं.४/२०१९ मधील नि.३५ वरील आदेश
## (सुभाष ज्ञानदेव माने वगैरे वि. हणमंत नामदेव जाधव वगैरे)
## (**CNR:MHSN**12000062-2019

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा व तुर्तातुर्त अर्ज दुरुस्तीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीसाठी व तुर्तातुर्त मनाईसाठी दखल केला आहे. तथापि दाव्यामध्ये व नि. ५ च्या अर्जावर काही मजकूर लिहायचे अनावधानाने राहिले आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती याकामी होणे न्यायाच्या दृष्टीने हितावह ठरणार आहे. सबब दाव्यामध्ये व तुर्तातुर्त अर्जामध्ये कलम ५ नंतर ५अ या नवीन कलमाची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. ''५अ यातील वादी यांच्या नावे असलेला ७/१२, फेरफार नं. ४८९, १२३५७ रद्द केल्याने वादी यांचे नाव कमी करुन प्रतिवादी यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झाली आहे. त्याचा गैरफायदा घेवून सदर वाद मिळकतीवर प्रतिवादी हे कर्ज काढणेची शक्यता आहे, गहाण देणेची शक्यता आहे. तसेच सदर मिळकत विक्री करण्याची शक्यता आहेत. यातील वादी यांनी मा. उपविभागीय अधिकारी, कडेगाव फेरफार नं. ४८९ व १२३५७ या नोंदी रद्द केल्यामुळे त्या निकालावर नाराज होवून मे. जिल्हाधिकारी, यांचेकडे अपील दाखल केले आहे. ते अद्याप न्यायप्रविष्ठ असून अंतिम निर्णय झालेला नाही. तथापि प्रतिवादी हे त्यांच्या झालेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून सदर मिळकतीत वादी यास गेली ३५ वर्षे असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीला बाधा होत आहे, हरकत होत आहे, अडथळे आणत आहेत. वास्तविक वादी यांनी केलेली खरेदीपत्रे दिवाणी न्यायालयाकडून रद्द झालेली नाहीत. केवळ नोंदीच फक्त रद्द झालेल्या आहेत. त्यामुळे वादी यांनी केलेली खरेदीपत्रे आज देखील अबाधित आहेत. वादी यांची मालकी केवळ नोंदी रद्द झाल्याने संपुष्टात येत नाही. वादी हे सदर मिळकत खरेदी घेतल्यापासून वाद मिळकत कसत आहेत. तसेच वहिवाट करीत आहेत. प्रतिवादींनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन मिळकतीचा कब्जा मागावा.''

३. वास्तविक प्रतिवादी यांनी वादी यांची खरेदीपत्रे दिवाणी न्यायालयाकडून रद्दबातल केलेली नाहीत. तसेच सदरची खरेदीपत्र रद्द वा वादी यांची मालकी ठरवण्याचे अधिकार केवळ दिवाणी न्यायालयास आहेत. वास्तविक सदरची मिळकत ही श्री भवानी देवी देवस्थान नागठाणे यांच्या मालकीची होती. तथापि सदर संस्थेला महसूलकडे चाललेल्या कामात समाविष्ट केले नव्हते व नाही. तसेच दावा कलम १०(इ)मध्ये ''प्रस्तुत वाद मिळकत संदर्भात प्रतिवादी यांनी कोणताही कर्ज बोजा करु नये. तसेच वाद मिळकती तबदील होतील असे कृत्य करु नये.''

४. त्याचप्रमाणे नि. ५ मधील अर्जातील कलम ६ नंतर ''प्रस्तुत वाद मिळकत संदर्भात प्रतिवादी यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो कोणताही कर्ज बोजा करु नये. तसेच वाद मिळकती संदर्भात तबदील/ विक्री करु नये अशी वादीवतीने प्रतिवादीस तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी'' अशा प्रकारची दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही. सबब सदर अर्जावर त्यांचेविरुध्द विना म्हणणे आदेश पारित करणेत आला.

६. वादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कोणत्याही दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी दाव्यामध्ये वादी, प्रतिवादी व दाव्याचे वर्णन अचुक असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मुळ दाव्यामध्ये तसेच तुर्तातुर्त ताकीद अर्जामध्ये वादी यांनी दुरुस्ती मागितलेली आहे. सदरच्या दुरस्तीमुळे दाव्याचे निराकरण होण्यास मदतच होणार आहे. याकामी वादी व प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी संधी उपलब्ध असणार आहे. सबब प्रस्तुतची दुरुस्ती ही दाव्याच्या निराकरणासाठी अत्यंत आवश्यक असल्या कारणाने सदरची दुरुस्ती करणेस परवानगी देणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादी यांचा नि.३५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मागणीप्रमाणे त्यांचा दावा आणि तुर्तातुर्त अर्ज विहीत वेळेत नि.३५ चे अर्जात सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

३. वादी यांनी सदरची दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत मे. कोर्टासाठी व प्रतिवादीसाठी पुढील तारखेस हजर करावी.

IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFAN ALI KHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2022.08.08 13:53:13 +05'30'

**पलूस** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक–०५/०८/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**पलूस.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 05/08/2022 |
| Signed by P. O. on | : | 05/08/2022 |
| Uploaded on | : | 08/08/2022 |